# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी,

२३५ पेनिनसुला हाऊस, ३ रा मजला, डॉ. दादाभाई नौरोजी रोड,
फोर्ट, मुंबई ४००००१
फोन नं. २२७०४४००, २२७०३०८६ फॅक्स (०२२) २२७०३०८६
E-mail : mail@mchmumbai.org Website - www.mchmumbai.org


.................................................................................................................................

डॉ. हॅनिमन जीवन गौरव पुरस्काराचे नियम -

१) या पुरस्काराकरिता नामांकन प्रस्ताव दरवर्षी दि. १ जानेवारी ते दि. ८ जानेवारी किंवा परिषद ठरवेल ज्या मुदती दरम्यान परिषदेकडून वेबसाईट वरील जाहिरातीद्वारे मागविण्यात येतील. सदर जाहिरातीमध्ये नियम व निकषांची माहिती परिषदेच्या संकेतस्थळावर देण्यात आल्यासंबंधीचा उल्लेख असावा.

२) पुरस्कार नामांकनाचे प्रस्ताव महाराष्ट्र राज्यातील व्यक्ती किंवा संस्थांना दि. १० फेब्रुवारी किंवा परिषदेने जाहिर केलेल्या मुदतीमध्ये परिषदेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात देणे आवश्यक राहील.

३) प्रस्ताव दाखल करताना ज्या संस्थेने प्रस्ताव दाखल केला असेल, त्या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी किंवा व्यक्तिगतरित्या प्रस्ताव दाखल करणाऱ्या व्यक्तीने या पुरस्काराबाबत नियम व निकष यांची माहिती असून त्याला अनुसरुनच प्रस्ताव दाखल करीत असल्याचे स्वसाक्षांकित पत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

४) दि. १० मार्च ते १५ मार्च या किंवा परिषदेने ठरविलेल्या कालावधी दरम्यान परिषदेने त्या त्या वेळी पुरस्कार निश्चितीकरिता स्थापन केलेल्या उपसमितीद्वारा परिषदेस प्राप्त नामांकन प्रस्तावांची नियम व निकष यांच्या आधारावर छाननी केली जाईल व पुरस्कारा करिता प्रत्यक वर्षी तीन व्यक्तींच्या नावाची निश्चिती केली जाईल. पुरस्कारांची संख्या वाढविणे किंवा कमी करणे परिषदेच्या अख्यत्यारीत राहिल.

५) परिषदेने जाहिर केलेल्या पुरस्कारांची प्रसिध्दी वृत्तपत्रातील बातम्या व परिषदेच्या संकेतस्थळावरील सूचना याद्वारे केली जाईल.

६) पुरस्कार प्राप्त व्यक्तींना त्यासंबंधीची सूचना स्वतंत्रपणे परिषदेतर्फे दिली जाईल.

७) पुरस्कारांचे वितरण परिषदेने निश्चित केलेल्या प्रमुख पाहुण्यांच्या सोयीनुसार शक्यतो वर्ष समाप्तीच्या अगोदर केले जाईल.

८) पुरस्कार प्राप्त व्यक्तीचा परिषदेतर्फे प्रमाणपत्र, मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन गौरव केला जाईल.

९) पुरस्कार विजेत्यांना वितरण सोहळयाकरिता येण्या-जाण्यासाठी शासनाच्या वर्ग-१ अधिकाऱ्याला लागू असलेल्या शासकीय नियमाप्रमाणे प्रवासभत्ता देण्यात येईल.

१०) उपरोक्त निकष व नियम सन २०१२-१३ या वर्षीच्या पुरस्कारापासून लागू करण्यात येतील.

# महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथी,

२३५ पेनिनसुला हाऊस, ३ रा मजला, डॉ. दादाभाई नौरोजी रोड,
फोर्ट, मुंबई ४००००१
फोन नं. २२७०४४००, २२७०३०८६ फॅक्स (०२२) २२७०३०८६
E-mail : mail@mchmumbai.org Website - www.mchmumbai.org

डॉ. हॅनिमन जीवन गौरव पुरस्काराचे निकष -

१) पुरस्काराकरिता ज्या वैद्यकीय व्यवसायिकाचे नामांकन करावयाचे आहे, ती व्यक्ती महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेकडे पंजीकृत असावी व नामांकन दाखल करतेवेळी किंवा पुरस्कार निश्चिती वेळी नोंदणी नुतनीकरणा बाबतीत कसूरदार नसावी.

२) पुरस्काराकरिता ज्यांचे नामांकन करावयाचे आहे, ते वैद्यकीय व्यावसायिक महाराष्ट्र राज्यात किमान २० वर्षे वैद्यकीय व्यवसायात कार्यरत असावेत.

३) ज्यांचे नामांकन दाखल करावयाचे आहे, ते वैद्यकीय व्यावसायिक महाराष्ट्र समचिकित्सा व्यावसायिक अधिनियम १९६० अन्वये तयार केलेल्या नीतीमत्ता व आचार संहितेतील तरतूदींचा भंग केल्याप्रकरणी दोषी ठरलेले नसावेत किंवा भारतीय दंड विधान संहितेनुसार दंडीत झालेले नसावेत किंवा पुरस्कार निश्चिती वेळी न्यायालयात दोषारोप पत्र दाखल झालेले नसावे.

४) पुरस्काराकरिता ज्यांचे नामांकन करावयाचे आहे, त्या होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिकांचे महाराष्ट्र राज्यात होमिओपॅथीचा प्रचार, प्रसार, विकास, शिक्षण व संशोधन यापैकी किमान एका क्षेत्रात मौलिक योगदान असावे.

५) होमिओपॅथिक वैद्यकीय व्यावसायिकाने सामाजिक क्षेत्रात दिलेले योगदान व त्याकरिता शासकीय, निमशासकीय किंवा नामवंत नोंदणीकृत संस्थेकडून त्यांना प्राप्त झालेले पुरस्कार ही अतिरिक्त गुणवत्ता समजली जाईल.

६) डॉ. हॅनिमन जीवन गौरव पुरस्कार समितीच्या सदस्यांचे नामांकन ते उपसमितीचे सदस्य असलेल्या वर्षी पुरस्काराकरिता विचारात घेतले जाऊ नये.